**<u>आर. बी. राऊत, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत, न्यायालय क्र. २ यांचे न्यायालय</u>**
**<u>गुन्ह्याचा तपशील</u>**

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३४२/२०२३</u>** **<u>नि.क्र.२२</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | : | २०/०६/२०२३ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | २१/०६/२०२३ |
| ३ | फिर्याददाराचे संपूर्ण नाव व पत्ता | : | लताबाई पाडुरंग भुजबळ<br>वयः५५ वर्षे, धंदाः शेती,<br>रा. जलालपुर, ता. कर्जत,<br>जि. अहमदनगर. |
| ४ | आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता | १. | महादेव मुरलीधर भुजबळ<br>वयः ४० वर्षे, धंदाः शेती, |
| | | २. | शोभा महादेव भुजबळ<br>वयः ३५ वर्षे, धंदाः शेती,<br>दोघे रा. जलालपुर,<br>ता. कर्जत, जि. अहमदनगर. |
| ५ | अपराधाचा तपशील | : | |

दि.१५/०६/२०२३ रोजी दुपारी ०२ः०० वाजेच्या सुमारास मौजे जलालपुर, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे फिर्यादीच्या राहत्या घरासमोर तुम्ही आरोपी क्र. १ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी आले व आरोपी क्र. २ ने फिर्यादीला खाली पाडले व आरोपी क्र. १ ने फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

दुसरे–उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. १ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादीला जाणीवपूर्वक शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल

असे कृत्य घडेल व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

येणे प्रमाणे गुन्ह्याचा तपशिल. वरील गुन्ह्याचा तपशिल आरोपीस मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.11.25 16:01:33 +0530

दिनांक : २५.११.२०२५
ठिकाण : कर्जत

**(आर. बी. राऊत)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कर्जत
(न्यायालय क्र. २)

## ६. <u>आरोपीची विनंती/म्हणणे खालीलप्रमाणे</u>

प्रश्न १. तुम्हाला फिर्यादीने दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय ?
उत्तरः- होय.

प्रश्न २. तुम्हाला गुन्ह्याचा तपशील वाचून समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय ?
उत्तरः- होय.

प्रश्न ३. तुम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय ?
उत्तरः- नाही.

प्रश्न ४. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तरः- मला गुन्हा कबुल नाही.

दिनांकः २५/११/२०२५

| **क्र.** | **आरोपीचे नाव** | **आरोपीची सही** | समक्ष |
|---|---|---|---|
| १. | महादेव मुरलीधर भुजबळ | .......................... | RAMRAO BABURAO RAUT<br>Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT<br>Date: 2025.11.25 16:01:44 +0530 |
| २. | शोभा महादेव भुजबळ | .......................... | (आर. बी. राऊत)<br>न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,<br>कर्जत,(न्यायालय क्र. २) |